दि. २५.०३.२०२३

**प्रेस नोट**

**आरोपी लोकसेवक जगन्नाथ लक्ष्मणराव भंडे, वय ४३ वर्ष, पद – पोलीस हवालदार, बक्कल नंबर ६२२, वर्ग – ३, ने. पोलीस ठाणे औसा, जि.लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक जगन्नाथ भंडे, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार विरूध्द औसा पोलीस स्टेशन येथे त्यांचे पत्नीचे फिर्यादीवरून दाखल झालेल्या गुरन १२९/२०२३ कलम ४९८(अ), ५०४, ५०६, ३४ भादवि मध्ये तक्रारदारास अटक न करता नोटीस देवुन सोडण्याच्या कामात मदत करण्यासाठी व तपासात तक्रारदाराच्या बाजुने मदत करण्यासाठी तक्रारदार यांना ३०,०००/– रू. ची लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि.२४/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि.२४/०३/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्या विरूध्द औसा पोलीस स्टेशन येथे त्यांचे पत्नीचे फिर्यादीवरून दाखल झालेल्या गुरन १२९/२०२३ कलम ४९८(अ), ५०४, ५०६, ३४ भादवि मध्ये तक्रारदारास अटक न करता नोटीस देवुन सोडण्याच्या कामात मदत करण्यासाठी व तपासात तक्रारदाराच्या बाजुने मदत करण्यासाठी पोलीस ठाणे औसा येथील पोलीस हवालदार जगन्नाथ भंडे यांनी तक्रारदार यांना ३०,०००/– रूपयाची लाच मागणी करून तडजोडीअंती १५,०००/– रू लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे आज दि. २४/०३/२०१६ रोजी तक्रारदार पोलीस ठाणे औसा येथील आलोसे यांच्या कार्यालयात येथे गेले असता आंलोसे पोलीस हवालदार जगन्नाथ भंडे यांनी त्यांचे कार्यालयात पंचासमक्ष २२.०२ वा. सुमारास लाचेची रक्कम १५,०००/– रू स्वत: स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहात पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार जगन्नाथ भंडे यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन औसा, जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तपास भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलूरे, शाम गिरी, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, मपोकॉ/रूपाली भोसले, चापोना/संतोष क्षीरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner